# B.Com. (Part–I) Examination
## MARATHI (Compulsory)
## (Languages)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—70

1. 'जीवनात कोणताच करार नसल्यामुळे जीवन दुबळे होते', असे पु.ग.सहस्त्रबुद्धे का म्हणतात ? ते 'जीवनातील करार' या पाठाच्या आधारे लिहा. 10

**किंवा**

'भारत देशाचे भविष्य उजळून निघावे, त्याने आकाशाला पालाण घालावे!' अशी मनीषा बाळगणाऱ्या डॉ. अब्दुल कलाम यांचे चिंतन या पाठाच्या आधारे लिहा.

2. 'बुद्धीचा महिमा' या पाठातून व्यक्त झालेले साने गुरुजी यांचे विचार थोडक्यात लिहा. 5

**किंवा**

'सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा पाया रचणारी चळवळ' या पाठाच्या आधारे शाहू महराजांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.

3. 'डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेले शिक्षण विषयक कार्य महत्वपूर्ण होय' असे डॉ. वि.भि. कोलते का म्हणतात ? ते लिहा. 10

**किंवा**

आत्मज्ञानाबद्दल गांधीजींचे विचार सांगून आत्मिक शिक्षण देण्यासाठी त्यांनी केलेल्या उपायांचा आढावा 'पंतोजी' या पाठाच्या आधारे घ्या.

4. 'संस्कार' या कथेतून नायकावर होत जाणाऱ्या संस्कारांचे चित्रण वामन कृष्ण चोरघडे यांनी कसे रेखाटले आहे ? 5

**किंवा**

'अनुत्तरीय प्रमेय' या पाठातून भारतातील जाति-व्यवस्थेचे दर्शन कसे घडते ? ते लिहा.

5. ज्ञानेश्वरांनी 'पसायदानातून' विश्वात्मक देवाकडे कोणते मागणे मागितले आहे ? 10

**किंवा**

'विद्यार्थ्यांप्रत' या कवितेतून कवी केशवसुतांनी विद्यार्थ्यांना कोणती शिकवण दिली आहे ?

6. 'तेव्हा एक कर' या कवितेत नारायण सुर्वे यांनी कोणते विचार मांडले आहेत, ते सांगा. 5

**किंवा**

'तयास मानव म्हणावे का ?' असा प्रश्न सावित्रीबाई फुले का उपस्थित करतात, ते थोडक्यात लिहा.

7. (1) जिजामाता महाविद्यालय, देऊळगाव राजा यांच्या नावे राजहंस प्रकाशन प्रा. लि. 1025 सदाशिव पेठ, पुणे यांना ग्रंथालयाकरिता उपलब्ध असलेल्या नव्या पुस्तकांची चौकशी करणारे पत्र लिहा. 5



(2) श्री. समर्थ महाविद्यालय, परतवाडा येथील विद्यार्थी भांडारासाठी स्टेशनरी साहित्याची मागणी करणारे पत्र मेसर्स, गावंडे ब्रदर्स स्टेशनरी मार्ट, नागपुर यांना प्रशांत पाटील, कार्यवाह, विद्यार्थी भांडार या नावाने पत्र लिहा. 5

**किंवा**

(3) विदर्भ महाविद्यालय, मलकापूर या महाविद्यालयाने आकाशवाणी केंद्र पाहण्यासाठी शैक्षणिक सहल आयोजित केली आहे. यासाठी केंद्र संचालक, आकाशवाणी केंद्र, जळगाव यांना केंद्र पाहण्यासाठी परवानगी मागणारे पत्र लिहा. 5

(4) प्रा. अनिल मुकुंद देवळे यांनी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे पत्नीच्या हृदयशस्त्रक्रियेसाठी सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून न परतावा रु. 50,000/- अग्रिम रक्कम मिळण्याबाबत अर्ज सादर केला आहे. त्यांचा भविष्य निर्वाह निधि खाते क्र. व्ही. 15/11010 या प्रमाणे आहे. प्रा. अनिल मुकुंद देवळे यांनी कार्यालयास पाठविलेल्या अर्जावर कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून आदेशाची अपेक्षा करणारी टिप्पणी लिहा. 5

8. जाहिरात म्हणजे काय ? हे सांगून जाहिरात माध्यमांचा ग्राहकांवर होणारा परिणाम स्पष्ट करा. 15

**किंवा**

जाहिरात मसुदा म्हणजे काय ? हे सांगून आकाशवाणीसाठी जाहिरात मसुदा लेखकाने कोण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या असतात, ते लिहा.